## थोडक्यात

### अजिंक्य, पृथ्वी 'हजारे' स्पर्धेत खेळणार

**मुंबई :** अजिंक्य रहाणे आणि पृथ्वी शॉ असे आंतरराष्ट्रीय अनुभव लाभलेले फलंदाज विजय हजारे वन-डे क्रिकेट स्पर्धेत मुंबईसाठी उपलब्ध असतील. याशिवाय रोहित शर्माही आहेच. मुंबई निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकरने ही माहिती दिली. उपांत्यपूर्व फेरीत मुंबईने बिहारला सहज पराभूत केले. हजारे स्पर्धेच्या उपांत्य फेऱ्या अनुक्रमे १७ व १८ ऑक्टोबरला रंगणार आहेत.

### रामकुमारचा पराभव

**नवी दिल्ली :** भारताच्या तिसऱ्या मानांकित रामकुमार रामनाथनवर निनग्बो (चीन) येथे सुरू असलेल्या एटीपी चॅलेंजर टेनिस स्पर्धेत सलामीलाच गारद होण्याची नामुष्की ओढावली. प्रज्ञेश गुणेश्वरनने मात्र दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. कोरियाच्या यनसीआँग चुंगने रामची झुंज १-६, ७-६ (९-७), ७-६ (७-२) अशी मोडून काढली. डावखुऱ्या प्रज्ञेशने महंमद सफावतला ७-६ (७-२), ६-२ असे नमवले.

### चंग पुण्यात खेळणार

**पुणे :** टाटा ओपन महाराष्ट्र टेनिस स्पर्धेत दक्षिण कोरियाचा २२ वर्षीय चंग हिऑन खेळणार आहे. या वर्षी ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये चंगने उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली होती. म्हाळुंगे-बालेवाडीतील शिवछत्रपती क्रीडानगरीत ही स्पर्धा होणार आहे. २९ डिसेंबरपासून पात्रता फेरी सुरू होईल, तर मुख्य स्पर्धेला ३१ डिसेंबरपासून प्रारंभ होईल.

# क्रिकेट लीग फोफावल्या

## 'आयसीसी'च्या आगामी बैठकीत टी-२०, टी-१० लीगबाबत होणार चर्चा

**वृत्तसंस्था,** सिंगापूर

जगभरात फोफावलेल्या टी-२० आणि टी-१० लीगचा बंदोबस्त करणे हा विषय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) आगामी बैठकीत प्रामुख्याने चर्चिला जाणार आहे. भारतातील इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) यशानंतर आयसीसीच्या अनेक सदस्यांनी त्यांच्या टी-२० लीग सुरू केल्या आणि त्यातून भ्रष्टाचार होण्याची शक्यता वाढली.

अफगाणिस्ताननेही आता आपली टी-२० लीग सुरू केली असून, ती सध्या संयुक्त अरब अमिरातीत सुरू आहे. त्यातच आता टी-१० म्हणजे १० षटकांच्या क्रिकेटचीही भर पडली आहे. येत्या १६ ते २० ऑक्टोबर या कालावधीत ही बैठक होणार आहे. त्यात हे मुद्दे चर्चिले जातील.

### कसोटी स्पर्धेबाबत चर्चा

या बैठकीमध्ये जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेबाबतही चर्चा होईल. पुढील वर्षी होत असलेल्या वन-डे वर्ल्ड कपनंतर ही कसोटी स्पर्धा होणार आहे. बीसीसीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या कसोटी स्पर्धेसाठी गुणांचे वाटप कसे असेल हे पाहिले जाईल. त्याशिवाय, २०२८च्या ऑलिंपिकमध्ये क्रिकेटचा समावेश करण्याविषयीही चर्चा केली जाईल. गेल्या बैठकीतही या मुद्द्यावर चर्चा झाली होती.



आयसीसीच्या बैठकीआधी त्यांचे क्रिकेट महाव्यवस्थापक जेफ अॅलरडाइस यांनी या वाढत्या लीगमुळे निर्माण झालेला धोका लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले की, या बैठकीत आम्ही या लीगची नियमावली आणि त्यांच्या मान्यतेविषयी चर्चा करणार आहोत. शिवाय, या लीगमध्ये खेळण्यासाठी खेळाडूंना परवानगी देण्याचा मुद्दाही चर्चेच असेल. या लीगची कागदपत्रे, करार, त्यांचे मालक, या लीगचा आर्थिक स्रोत या सगळ्यांचा गांभीर्याने विचार करून मगच त्यांना मंजुरी देण्याचा विचार प्राधान्याने होईल. एकूणच कुणीही यावे आणि लीग सुरू करावी असे आता करता येणार नाही. भविष्यात अशा लीगना मंजुरी देताना कठोर निकष पाळावे लागतील. शिवाय, अशा लीगना त्या देशाकडून आणि आयसीसीकडूनही मंजुरी आवश्यक असेल. या बैठकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात आयसीसीच्या पहिल्या स्वतंत्र महिला संचालक म्हणून पेप्सीको कंपनीच्या माजी मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रा नुयी यादेखील उपस्थित राहणार आहेत.

### आयसीसीच्या निशाण्यावर जयसूर्या

**दुबई :** आयसीसीने भ्रष्टाचारासंदर्भात सुरू केलेल्या चौकशीला सहाय्य करत नसल्याबद्दल श्रीलंकेचा माजी सलामीवीर सनथ जयसूर्या याला दोन आठवड्यात स्पष्टीकरण देण्यास सांगण्यात आले आहे. जर त्याने स्पष्टीकरण दिले नाही तर त्याविरोधात कोणती कारवाई करण्यात येईल, हे मात्र आयसीसीने जाहीर केलेले नाही. आयसीसीची ही चौकशी २०१५मध्ये सुरू झाली असून जयसूर्याने त्याला सहकार्य न केल्यामुळे त्याच्यावर कारवाई होऊ शकते, असे श्रीलंका क्रिकेट बोर्डाच्या सूत्रांनी सांगितले. गॉल स्टेडियममधील क्युरेट जयनंदा वर्णवीरा यांच्यावर २०१६मध्ये तीन वर्षांची बंदी घालण्यात आली होती. त्यानंतर ही चौकशी सुरू झाली. वर्णवीरा यांनी आयसीसीच्या भ्रष्टाचार विरोधी विभागाला सहकार्य करण्यास विरोध दर्शविला होता.

जयसूर्यावर आयसीसीच्या भ्रष्टाचार विरोधी आचारसंहितेतील दोन नियमांचा भंग केल्याचा आरोप आहे. २.४.६नुसार कोणतेही स्पष्टीकरण न देता जयसूर्याने चौकशीला सहकार्य करण्यास नकार दिला आहे. तसेच २.४.७नुसार चौकशीला विलंब करण्यात हातभार लावला आहे. शिवाय, त्यासाठी आवश्यक पुरावे नष्ट करण्याचा किंवा त्याच्याशी छेडछाड करण्याचाही प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

# हॉकीत भारताला दोन रौप्यपदके

**युवा ऑलिंपिक**

**ब्यूनॉस आयर्स :** भारताच्या मुले आणि मुलींच्या हॉकी संघाला युवा ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्णयश मिळवण्यात अपयश आले. भारताच्या दोन्ही संघांना अंतिम फेरीत पराभव पत्करावा लागला. अर्थात, रौप्यपदक मिळवण्याची कामगिरीही भारतासाठी ऐतिहासिक ठरली. कारण, या स्पर्धेत भारताचे हॉकी संघ प्रथमच सहभागी झाले होते.

फाइव्ह-अ-साइड प्रकारात ही स्पर्धा झाली. मुलांच्या गटाच्या अंतिम फेरीत मलेशियाने भारतावर ४-२ने मात केली. मलेशियाने हे या स्पर्धेतील पहिलेवहिले सुवर्णपदक ठरले. खरे तर भारताने या स्पर्धेत आक्रमक सुरुवात केली होती. दुसऱ्याच मिनिटाला कर्णधार विवेक सागर प्रसादने गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली होती. दोन मिनिटांनंतर फिरादस रोसदीने गोल करून मलेशियाला बरोबरी साधून दिली. पाचव्या मिनिटाला विवेक सागर प्रसादने दुसरा गोल करून भारताला पुन्हा आघाडी मिळवून दिली. मध्यंतराला भारताने २-१ अशी आघाडी राखली होती. उत्तरार्धात मलेशियाने आक्रमक खेळ केला. तेराव्या मिनिटाला अखिमुल्ला अनूरने गोल केला, तर तीन मिनिटांनंतर अमिरुल अझहरने मलेशियाकडून आणखी एक गोल केला. लढत संपायला दोन मिनिटे शिल्लक असताना अनूरने मलेशियाकडून चौथा गोल केला. दुसरीकडे, अर्जेंटिनाने झाम्बियावर ४-०ने मात करून ब्रॉँझपदक मिळवले.

मुलींच्या अंतिम फेरीत यजमान अर्जेंटिनाने भारतावर ३-१ने विजय मिळवला आणि सुवर्ण पटकावले. मुमताझने ४९व्या सेकंदालाच गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली. सहाव्या मिनिटाला गिअनेला पॅलेटने गोल करून अर्जेंटिनाला बरोबरी साधून दिली. नवव्या मिनिटाला सोफिया रामाल्लोने गोल करून अर्जेंटिनाची आघाडी वाढवली. यानंतर ब्रिसा ब्रुगेस्सेरने गोल करून अर्जेंटिनाला ३-१ने विजय मिळवून दिला.

# सलामीवीर अन् यष्टिरक्षकासाठी खल

**वृत्तसंस्था,** हैदराबाद

**ऑस्ट्रेलिया दौरा**

इंग्लंड दौऱ्यानंतर भारतीय क्रिकेट संघाचा सर्वाधिक चर्चेतील दौरा आहे तो ऑस्ट्रेलियाचा. इंग्लंडप्रमाणे ऑस्ट्रेलियातही भारताची कसोटी लागणार आहे. त्यामुळे भारतीय निवड समितीला या दौऱ्यासाठी संघ निवड करताना तिसरा सलामीवीर आणि अतिरिक्त यष्टिरक्षक या गोष्टी विचारात घ्याव्या लागणार आहेत. नोव्हेंबरअखेरीस भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर रवाना होणार आहे.

रविवारी आटोपलेल्या विंडीजविरुद्धच्या एकतर्फी कसोटी मालिकेचे फलित म्हणजे पृथ्वी शॉ आणि रिषभ पंत यांच्यासारख्या युवा फलंदाजांची लक्षात राहण्याजोगी कामगिरी. या दोघांनी विंडीजविरुद्ध खणखणीत कामगिरी करत ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटीसाठी तरी अंतिम अकरामधील आपला समावेश पक्का केला आहे. लोकेश राहुल विंडीजविरुद्ध सलामीला आला होता. मात्र, त्याला छाप पाडण्यात यश आले नाही. अर्थात, त्याला संघ व्यवस्थापनाचा पाठिंबा दिसतो आहे.

यष्टिरक्षक वृद्धिमान साहा अद्याप पूर्ण फिट नाही. तेव्हा त्याची ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर निवड होण्याची शक्यता कमी आहे. त्याची निवड झाली, तरी रिषभ पंतने फलंदाजीत आपण सरस असल्याचे दाखवून दिले आहे. साहा फिट झाला नाही तर अतिरिक्त यष्टिरक्षक म्हणून कोना भरतच्या नावाचीही चर्चा आहे.

### भारत 'अ'चा पराभव

**मुंबई :** ऑस्ट्रेलिया 'अ' महिला संघाने सोमवारी भारत 'अ' संघावर ९१ धावांनी विजय मिळवत तीन वन-डेंच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

**संक्षिप्त धावफलक :** ऑस्ट्रेलिया 'अ'- ५० षटकांत ८ बाद २७१ (ताहिला मॅकग्राथ ५८, हीथर ग्रॅहम ४८; प्रीती बोस ३-४२, रिमालक्ष्मी इक्का २-४२, गायकवाड १-४८, दिब्यादर्शिनी १-५१) वि. वि. भारत 'अ'- ४६.२ षटकांत सर्वबाद १८० (प्रीती बोस नाबाद ६२, शिखा पांडे ४२; मॉली स्ट्रॅनो ३-२३).

# भारतीय संघाची विजयी सलामी

**म. टा. प्रतिनिधी,** पुणे



दुर्गा राव

दुर्गा रावची अष्टपैलू कामगिरी आणि डी. वेंकटेश्वराच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर यजमान भारतीय संघाने अंधांच्या टी-२० क्रिकेट मालिकेतील सलामीच्या सामन्यात पाहुण्या श्रीलंकेवर ३९ धावांनी विजय नोंदविला.

नेहरू स्टेडियममध्ये हा सामना झाला. प्रथम फलंदाजी करताना भारताने निर्धारित २० षटकांत ६ बाद १९० धावांपर्यंत मजल मारली. त्यात वेंकटेश्वराने नाबाद ५०, तर दूर्गाने २७ धावांची खेळी केली. प्रत्युत्तर देताना श्रीलंकेला निर्धारित २० षटकांत ९ बाद १५१ धावांपर्यंतच मजल मारता आली. सिल्वाने सर्वाधिक ५७ धावांची खेळी केली, तर भारताकडून दूर्गाने २४ धावांत दोन विकेट घेतल्या.

पारितोषिक वितरण कोहिनूर ग्रुपचे व्यवस्थापकिय संचालक कृष्णकुमार गोयल, भाजपाचे शहराध्यक्ष योगेश गोगावले, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सचिन इटकर, क्रिकेट असोसिएशन फॉर दि ब्लाइंड इन इंडियाचे सचिव जॉन डेव्हिड, क्रिकेट असोसिएशन फॉर दि ब्लाइंड ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष रवी वाघ, सहसचिव दिलीप शेलवंटे, पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेचे चेअरमन यशवंत भुजबळ यांच्या उपस्थितीत झाले.

# तारा शहाला विजेतेपद



**पुणे :** पुण्याच्या तारा शहाने अखिल भारतीय सब-ज्युनियर मानांकन बॅडमिंटन स्पर्धेतील १५ वर्षांखालील मुलींच्या एकेरीचे विजेतेपद पटकावले.

पाटण्यात ही स्पर्धा झाली. १५ वर्षांखालील मुलींच्या अंतिम लढतीत द्वितीय मानांकित तारा शहाने चौथ्या मानांकित तनीशासिंगवर २१-१९, २१-८ अशी मात केली आणि जेतेपद पटकावले. नागपूरला जुलैत झालेल्या स्पर्धेत उत्तर प्रदेशच्या तनीशाने ताराला हरविले होते. या वेळी मात्र ताराने बाजी मारली. तत्पूर्वी, उपांत्य फेरीत ताराने अनुपमा उपाध्यायला २१-१९, २१-१४ अशी, तर तनीशाने हृशा दुबेला १६-२१, २१-९, २१-१८ असे पराभूत केले होते. यापूर्वी, ताराने ऑगस्टमध्ये हैदराबादला झालेल्या अखिल भारतीय स्पर्धेतील १५ वर्षांखालील मुलींत विजेतेपद पटकावले होते.



# शिवाई क्रीडा मंडळाचा विजय

**पुणे :** शिवाई क्रीडा मंडळ, ज्ञान प्रबोधिनी संघ या संघांनी अनंता पाडाळे स्मृती जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय नोंदविला. महिला गटात शिवनेरी चिंचवलेच्या चढाया आणि मयूरी सूर्यवंशीने केलेल्या अचूक पकडींच्या जोरावर शिवाई मंडळाने शिवप्रताप संघावर ४०-३८ अशी मात केली. शिवप्रताप संघाकडून अक्षदा सुपेकर, समीक्षा कोल्हे यांनी दिलेली लढत अपुरी पडली. ज्ञान प्रबोधिनी संघाने बारामतीच्या स्पोर्ट्स अॅकॅडमीवर ३८-२७ असा विजय नोंदविला. विजयात सत्यवा हळदकेरी, संजना पोळ, आरती बोडके यांनी मोलाचा वाटा उचलला. तसेच, सोनाली सकटच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर श्रमदान प्रतिष्ठानने नवजीवन संघावर ५४-२८ अशी मात केली.

# झारखंडचा महाराष्ट्रावर विजय

**पुणे :** पावसाचा फटका बसलेल्या सामन्यात झारखंडने महाराष्ट्रावर (व्हीजेडी मेथडनुसार) ८ विकेटनी मात करत विजय हजारे करंडक क्रिकेट स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. बेंगळुरूत ही लढत झाली.

**संक्षिप्त धावफलक :** महाराष्ट्र - सर्वबाद १८१ (रोहित मोटवानी ५२, राहुल त्रिपाठी ४७, अनुकुल रॉय ४-३२) पराभूत वि. झारखंड - ३२.२ षटकांत २ बाद १२७ (शशीम राठोड नाबाद ५३, समद फल्ला १-१३).

# स्क्वॉशपटू अर्णवचा गौरव



अर्णव सरीन

**पुणे :** पुण्याच्या अर्णव सरीनने नुकत्याच चेन्नईत झालेल्या आशियाई स्क्वॉश स्पर्धेत रौप्यपदक मिळविले. अंतिम लढतीत पाकिस्तानच्या महंमद हमजा खानने अर्णववर ११-६, ११-९, ११-७ अशी मात केली. रौप्यपदक मिळविल्यानंतर पुण्यात परतलेल्या अर्णवचा सोमवारी पूना क्लबमध्ये सत्कार करण्यात आला. या वेळी अर्णवचे प्रशिक्षक दीपक मुलानी, पूना क्लबचे मनीष मेहता, शशांक हळबे, रोहन पुसाळकर आदी उपस्थित होते. 'आता जयपूरला होणाऱ्या राष्ट्रीय ज्युनियर स्पर्धेवर लक्ष केंद्रित करणार आहे,' अर्णवने सांगितले.


## पुणे पीपल्स् को-ऑपरेटीव्ह बँक लि., पुणे
(मल्टीस्टेट बँक)

मुख्य कार्यालय: ६०६, सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणे ४११०३० फोन: ०२०-२४४५२३५३/२४४५२८४३/२४४५०६८५

### जाहीर लिलावाने विक्रीची नोटीस

''जशी आहे तशी'' या तत्वावर मिळकतीची विक्री

मी खाली सही करणार सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अॅसेट अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३(१२) अन्वये अधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त झालेलो असून सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि नियम, २००२ मधील नियम ८ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन खाली निर्देश केलेल्या कर्जदाराच्या तारण मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. कर्जदाराने मागणी केल्यानुसार कर्ज फेड केली नसल्याने खालील तारण मालमत्ता विकून बँकेच्या येणे रकमेची वसुली करण्याचे ठरविले आहे.

| कर्जदाराचे व गहाणखत मिळकतदाराचे नाव | दि. ३१.१०.२०१४ रोजी येणे बाकी | मिळकतीचे ठिकाण व तपशील | राखीव मूल्य लिलाव तारीख व वेळ |
|---|---|---|---|
| १) कर्जदार व गहाणखत मिळकतदार : श्री. कुलजीतसिंग कुलदीपसिंग भट्टी<br>२) कर्जदार व गहाणखत मिळकतदार : श्रीमती मंजीतकौर कुलदीपसिंग भट्टी | रु.७,६४,२४९/- अधिक पुढील व्याज इतर खर्च, शुल्क इ. | ''श्री सत्यम् को. ऑप. हौसिंग सोसा.,'' सर्व्हे नं. ८/१, फ्लॅट नं. ३५, ए विंग, क्षेत्र ८२० चौ. फूट म्हणजेच ७६.१८ चौ. मी. बिल्ट अप. तिसरा मजला. मौजे बोपोडी, ता. हवेली, जि. पुणे. | रु. ३४,०३,०००/- दिनांक व वेळ १७.११.२०१८ दु. १२.०० वा. ते दु. १.०० वा. |

टीप: बँकेच्या माहितीनुसार सदर मालमत्तेवर अन्य बोजा नाही. मिळकत कर, एमएसईबी इ.बाबतची खातरजमा खरेदी घेवू इच्छिणाऱ्यांनी करावयाची आहे.

**नियम व अटी:**

१) लिलावात भाग घेणाराने लिलावापूर्वी परत मिळणारे डिपॉझिट रु.१,००,०००/-तसेच परत न मिळणारी लिलाव फी रु.१०००/- लिलावाच्या ठिकाणी जमा करणे आवश्यक आहे.

२) लिलाव बँकेच्या मार्केटयार्ड शाखा, पहिला मजला, प्लॉट क्र. ४७७/४७८, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११०३७ येथे शनिवार दि.**१७.११.२०१८** रोजी होईल. मिळकतीची पाहणी लिलाव दिनांकापर्यंत पूर्वनियोजित वेळ घेवून स. ११ ते दु. २ या वेळात करता येईल. तसेच दि.**१२.११.२०१८** रोजी पूर्वनियोजित वेळ न घेता मिळकत पाहणी करता येईल.

३) लिलाव मंजूर करणे, स्थगित करणे अथवा कोणतेही कारण न देता रद्द करणे इ. चे सर्व अधिकार अधिकृत अधिकारी यांचेकडे राखीव आहेत.

४) जागेबाबत व लिलावाच्या अटी आणि शर्तींसाठी बँकेच्या मुख्य कार्यालयात संपर्क करावा. ( अजय रजपूत, ९३७२०७९४१५)

५) सदर दिवशी काही कारणाने लिलाव स्थगित झालेस कोणतेही कारण न देता बँक प्रस्तुतचा लिलाव सदर लिलावाचे दिवसापासून ७ दिवसांचे आत करू शकेल. त्यावेळी प्रस्तुत नोटीसीची गरण असणार नाही.

स्थळ : पुणे
दिनांक :१६.१०.२०१८

अजय रजपूत
अधिकृत अधिकारी व सहा. सरव्यवस्थापक
पुणे पीपल्स को ऑप.बँक लि.,पुणे



## बजाज फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: आकुर्डी, पुणे - 411 035
कॉर्पोरेट कार्यालय: 4 था मजला, बजाज फिन्सर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, ऑफ पुणे-अहमदनगर रोड, विमान नगर, पुणे - 411 014

**मुदत ठेव योजना**

**'FAAA/Stable' मनांकन (रेटिंग) CRISIL द्वारे | 'MAAA (Stable)' मानांकन (रेटिंग) ICRA द्वारे**

वरील मानांकन, इन्स्ट्रुमेंटवरील व्याज आणि मूळ रक्कमेची वेळेवर परतफेड या दृष्टिने उच्च श्रेणीची सुरक्षितता दर्शवते.

व्याजदर वार्षिक रु 5 कोटींपर्यंत वैध आहे. (17 ऑक्टोबर 2018 पासून लागू) (% वार्षिक.)

| अवधी महिन्यांमध्ये | किमान ठेव (रुपयांमध्ये) | संचयी | गैर-संचयी | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मासिक | त्रैमासिक | अर्ध वार्षिक | वार्षिक |
| 12 – 23 | 25,000 | 8.00% | 7.72% | 7.77% | 7.85% | 8.00% |
| 24 – 35 | | 8.15% | 7.88% | 7.93% | 8.00% | 8.15% |
| 36 – 60 | | 8.75% | 8.42% | 8.48% | 8.57% | 8.75% |
| विशेष अवधी योजना | | | | | | |
| 15 | 1,00,000 | 8.05% | 7.77% | 7.82% | 7.89% | 8.05% |

क) किमान ठेव वरील नमूद केल्या प्रमाणे.

ख) (i) ज्येष्ठ नागरिक (60 वर्षांपेक्षा अधिक वयाचे, वयाच्या पुराव्याच्या तरतुदिनुसार) – अतिरिक्त दर 0.35% वार्षिक, रु 5 कोटींपर्यंतच्या ठेवीसाठी.
(ii) बजाज ग्रुप कर्मचारी- रु. 5 कोटींपर्यंत डिपॉझिटसाठी अतिरिक्त दरसाल 0.25% दर (बजाज होल्डिंग्ज अँड इनवेस्टमेंट लि., बजाज ऑटो लि., बजाज फिनसर्व लि., बजाज फायनान्स लि., महाराष्ट्र स्कूटर्स लि., बजाज अलियांझ जनरल इंशुरन्स कं. लि., बजाज अलियांझ लाइफ इंशुरन्स कं. लि., बजाज हाउसिंग फायनान्स लि., बजाज फिनसर्व डायरेक्ट लि., मुकंद लि. आणि बजाज इलेक्ट्रिकल्स लि. चे कर्मचारी)
(iii) बजाज फायनान्स लिमिटेड वर्तमान कर्जधारक ग्राहक - अतिरिक्त दर 0.25% वार्षिक, रु. 5 कोटींपर्यंतच्या ठेवीसाठी
(iv) बजाज फायनान्स लिमिटेड वर्तमान मुदत ठेव ग्राहक - अतिरिक्त दर 0.25% वार्षिक, रु 5 कोटींपर्यंतच्या ठेवीसाठी (0.25% चा लाभ घेण्यासाठी गुंतवणूकदारांनी पहिल्या आणि दुसऱ्या ठेवीत 2 महिन्यांचे अंतर ठेवायला हवे.
प्रती व्यवहार वरीलपैकी पक्त एकाच विशेष श्रेणीचा लाभ घेता येईल.

ग) मुदत ठेव नूतणीकरण ग्राहक – (फक्त व्यक्ती) - अतिरिक्त दर 0.25% वार्षिक, रु 5 कोटींपर्यंतच्या ठेवीसाठी. अतिरिक्त दर विशेष श्रेणी लाभाच्या व्यतिरिक्त लागू.

घ) रु. 5 कोटींपेक्षा अधिक जास्तच्या एक रकमी ठेवीसाठी व्याजदर प्रकाशित कार्ड दरापेक्षा वेगळा असू शकतो व तो बजाज फायनान्स लिमिटेड द्वारे प्रत्येक प्रकरणानुसार ठरवला जाईल.

दि. 19 जुलै 2018 रोजी संचालक मंडळाच्या बैठकतील दिलेल्या मान्यतेनुसार कंपनीच्या मुदत ठेव योजनेच्या सर्व अटि व शर्ती त्याच आहेत.

दिनांक: 11 ऑक्टोबर 2018
स्थळ: पुणे

बजाज फायनान्स लिमिटेडसाठी
राजीव जैन
व्यवस्थापकीय संचालक

**गुंतवणुक कशी करावी:**

रक्कम फक्त धनादेशाद्वारे जमा करावी व धनादेश बजाज फायनान्स लिमिटेड – खाते क्रमांक – 00070350006738 ला देय असवा आणि क्रॉस करुन अकाऊंट पेयी ओन्ली' असावा. हे धनादेश सममूल्य व CTS अनुरुप असावे. आवश्यक त्या रकमांसह अर्ज आणि बीएफएलच्या मुदत ठेव योजना वितरकांना पाठवावे किंवा कोणत्याही बीएफएल शाखेमध्ये सादर करावे.

**ईमेल: fd@bajajfinserv.in | मिस कॉल: +91 92100 35555 | फोन: 020-71124281**

**9.00%*** पर्यंत व्याज दर सध्याच्या फिक्स्ड डिपॉझिट** किंवा कर्जाच्या ग्राहकांसाठी

**9.10%*** पर्यंत व्याज दर ज्येष्ठ नागरिकांसाठी

*व्याज दर दरसाल आहे, 36-60 महिन्यांच्या संचयी स्कीम मुदतीवर संबंधित ग्राहक वर्गवारीसाठी लागू. नियम आणि अटी लागू.
**पहिल्या आणि दुसऱ्या ठेवी दरम्यान दोन महिन्यांचं अंतर असेल.



## IndusInd Bank

**CIN:** L65191PN1994PLC076333 **I Regd. Office:** 2401, Gen. Thimmayya Road, Cantonment, Pune - 411 001.
**Corporate Office:** 8th Floor, Tower 1, One Indiabulls Centre, 841 S. B. Marg, Elphinstone Road, Mumbai - 400 013.

(₹ in Lakhs)

**Q2 FY 19 Performance**

Operating Profit up by **22%** Y-o-Y

Core Fee Income up by **20%** Y-o-Y

Net Interest Income up by **21%** Y-o-Y

Credit Cost fell to **12 bps**

Capital Adequacy Ratio at **14.28%**

**Unaudited Financial Results for the quarter/ half year ended September 30, 2018**

| Particulars | Quarter ended 30.09.2018 (unaudited) | Half year ended 30.09.2018 (unaudited) | Quarter ended 30.09.2017 (unaudited) |
|---|---|---|---|
| Total income from operations | 675537 | 1312512 | 539592 |
| Net Profit/ (Loss) for the period (before tax, exceptional and /or extraordinary items) | 140217 | 296329 | 133975 |
| Net Profit/ (Loss) for the period before tax (after exceptional and /or extraordinary items) | 140217 | 296329 | 133975 |
| Net Profit/ (Loss) for the period after tax (after exceptional and/or extraordinary items) | 92025 | 195597 | 88010 |
| Equity Share Capital | 60130 | 60130 | 59887 |
| Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Audited Balance Sheet of the previous year) | 2287922 (As at 31.03.2018) | 2287922 (As at 31.03.2018) | 1967338 (As at 31.03.2017) |
| Earnings Per Share (of ₹10 each) (for continuing and discontinued operations) (not annualised) | | | |
| - Basic | 15.32 | 32.57 | 14.70 |
| - Diluted | 15.17 | 32.26 | 14.54 |

Note:
1. The above is an extract of the detailed format of Quarterly/ Annual Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the Stock Exchange websites (www.bseindia.com and www.nseindia.com) and Bank website www.indusind.com.
2. Information relating to Total Comprehensive Income and Other Comprehensive Income are not furnished as Ind AS is not yet made applicable to banks.

**Mumbai**
**October 15, 2018**

**Romesh Sobti**
**Managing Director & CEO**